# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२७० /२०२३

विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार मार्च, २०२३ उन्हाळी सत्राच्या परीक्षांचे आयोजन दिनांक ०६ जून, २०२३ पासून सुरु करण्यात आलेले आहे. याबाबत सर्व संबंधितांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात आलेले असून परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेली आहेत.

विद्यापीठ संलग्नीत काही महाविद्यालयाकडून प्राप्त विनंतीनुसार दिनांक २९ जून, २०२३ रोजी बकरी ईद व आषाढी एकादशी सण येत आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक २९ जून, २०२३ रोजीच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयातील (अहमदनगर, नाशिक व पुणे) परीक्षा संस्थगित करुन त्यांचे पुर्नःआयोजन रविवार दिनांक ०९ जुलै, २०२३ रोजी पूर्वीच्या वेळापत्रकातील वेळेनुसार करण्यात येत आहे.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/ ७८६
दिनांक: २६/06/2023

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.